Vol 4 Issue 9 March 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# स्वातंत्र्य चळवळीत जव्हार तालुक्याचे योगदान

**संदेश वाघ**

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

***सारांश :-*** सन 1857 उठावाची लाट संपूर्ण भारतभर पसरलेली होती. त्यावेळी जव्हार पासून 8 मैलावर नांदगाव या खेडयात धाकटया पातीचे देवबाराव यांच्याकडे जव्हार संस्थानच्या सैन्याचा ताबा होता. संस्थानाच्या हद्दीतील लोक ब्रिटिषांना फितुर होऊ नयेत म्हणून त्यांनी सर्व काळजी घेतली होती. आपल्या जवळील अल्प सैन्यासह 1857 च्या उठावामध्ये सहभागी होऊन त्यांनी ब्रिटिषांबरोबर सामना दिला. ''अखेर ब्रिटिषांनी त्यांना पकडून दीर्घ मुदतीची षिक्षा दिली. नंतर त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये डांबून ठेवण्यात आले. त्यातच त्यांचा मृतयू झाला. ही स्वातंत्र्य चळवळीतील जव्हारच्या सहभागाची सुरूवात होती.''[1]

## प्रस्तावना

जव्हार संस्थानातील दुसऱ्या एका घटनेसंदर्भात इ.स. १९१० च्या पोलिस रेकॉर्डस मध्ये आलेल्या माहितीनुसार जव्हार संस्थानात कारभारी म्हणून १८८३ ते १९०६ या काळात काम पाहिलेले रामचंद्र मोरेश्वर जोग यांनी संस्थांनाची आपली नोकरी सोडल्यानंतर जव्हारच्या राजाने त्यांना ३००० रूपये बक्षिसी दिली. शिवाय महिना ५० रूपये प्रमाणे आर्थिक तरतूद केली. परंतु निवृत्त झाल्यानंतर श्री. जोग यांनी जहालमतवादी गटाशी संबंध ठेवल्यामुळे जव्हारच्या राजाने त्यांना दिले जात असणारे पेन्शन बंद केले.''[२]

२४ डिसेंबर १९१२ रोजीच्या डी.आय.जी. च्या अहवालानुसार जव्हार येथे छबिलदास रामदास तेलगू यांच्या आणि जव्हार येथील राजाचे अंगरक्षक महमद यांच्या घरी जव्हार संस्थानातील 'कऱ्हाडोह' येथे राजकीय स्वरूपाची बैठक झाली. डहाणू सर्कल इन्स्पेक्टरच्या अहवालानुसार ही सभा स्वातंत्र्यवीर वि.दा. सावकरांबाबत नव्हती. सभेत उपस्थित असणारे लोक गैरवर्तणुकीसाठी ओहखले जात होते. कारण सावकरांबाबत तेव्हा या लोकांनी सक्रिय हितसंबंध असल्याने दाखविले होते. परंतु यानंतर डहाणू सर्कल इन्स्पेक्टर

यांनी अशा प्रकारचे संबंध नसल्याचे मत नोंदविले आहे. या सभेला धोंडू विनायक तेंडुलकर - अव्वल कारकून मलवाडा, ता. जव्हार, गणेश अण्णाजी चिमोटे जव्हार संस्थानाचा कारभारी यांचा चिटणीस गणपतराव कापसे, गणपतराव वानखेडे, जव्हारमधील व्यापारी व सावकार गुलाबराव रामदास तेलंगू - गुजराती वनिजा अब्दुल सोनार - राजाचा अंगरक्षक छबिलदास - जव्हारमधील दुकानदार इ. जव्हारमधील रहिवाशांशिवाय कृष्णाजीपंत साने जंगल इन्स्पेक्टर, गुप्ते, फाळके, बाबूराव जोशी, रामराव मुळे, त्रिंबक भट, तात्या प्रभू, नारायण करंदीकर, वकील अब्दुल सोनार यांचा पुत्र हुसैन आणि जव्हारच्या राजाचे गुरू उपस्थित होते. ''या बैठकीत सावकारांबाबत चर्चा न झाल्याची नोंद केली असली तरी जव्हार संस्थान वि.दा. सावरकारांची सासूरवाडी असल्यामुळे आणि ते एक संस्थान असल्यामुळे तेथील घडामोडींवर पोलिस बारीक लक्ष ठेवून होते.''[३]

'' इ.स. १९३०च्या सविनय कायदेभंग चळवळीत जव्हारमधील विष्णु महादेव गोगटे यांनी अहमदनगर आणि रेजवी पांडू चौधरी यांनी पुणे येथे सत्याग्रहात भाग घेतला''[४] जव्हार संस्थानचे एक नागरिक महादेवराव वैदय यांचे पुत्र विष्णु उर्फ अप्पा यांनी विलेपार्ले येथील सत्याग्रह छावणीत दाखल होऊन भाग घेतला शिवाय शिरोड, जि. रत्नागिरी येथील मिठाच्या सत्याग्रहांत भाग घेऊन ऑफिस सांभाळण्याचे काम केले. यानंतर त्यांनी १९३२ मध्ये अहमदनगर येथे मिरवणूक काढून कायदा मोडल्याबाबत ५ महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगली. सन १९४२ मध्ये चले जाव चळवळीत भाग घेतल्याबद्दल [५] महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगली. सन १९४२ मध्ये चले जाव चळवळीत भाग घेतल्याबद्दल ५ महिने

अंडर ट्रायल म्हणून तुरूंगावास भोगला. वैयक्ति सत्याग्रही म्हणून मुकुंदराव जीवन संख्ये यांना १६ जानेवारी १९४१ रोजी अटक करण्यात आली. याचवेळी जव्हारचे तरूण आदिवासी स्वातंत्र्य सैनिक रेवजी पांडु चौधरी यांनी पुणे येथे इ.स. १९३२ मध्ये सत्याग्रह करून ६ महिन्यांची शिक्षा भोगली तर विक्रमगड येथील भानुशली प्रभुदास सिताराम यांनीही सत्याग्रहात भाग घेतल्याचा उल्लेख सापडतो.

इ.स. १९४५ मध्ये जव्हार संस्थानचे शेवटचे राजे श्री. यशवंतराव मार्तंडराव मुकणे यांनी बॅरिस्टर पदवीचा अभ्यास करण्यासाठी डहाणूचे वकील वासुदेव आत्माराम करंदीकर या वकील असलेल्या स्वातंत्र्यसेनानीची मदत घेतली. यावेळी वासुदेव करंदीकर यांनी दोन महिने जुन्या राजवाडयातील वास्तव्य काळात घटनेचा फायदा आणि रोमन कायदा या विषयांची चर्चा राजे यशवंतराव यांच्या बरोबर केली. अशा प्रकारे ब्रिटीश राजवहीत यापूर्वी दोन वेळा तुरूंगवास भोगलेल्या वासुदेव करंदीकर यांचा संस्थानाधिपतींशी निकटचा संबंध आल्यानंतर करंदीकरांनी जव्हार मधील मुकुंद जीवन संख्ये, केशव सखानराम जोशी, लक्ष्माण वाळाभाऊ आळशी विक्रमगड, रेवजीपांडू चौधरी – खरवंद यांच्या मदतीने संस्थानी प्रजेच्या राजकीय हक्कांसाठी लढा दिला. ''या लढयाचे स्वरूप संस्थांनी सत्तेविरूद्ध असले. तरी त्याला स्वातंत्र्यचळवळीची पार्श्वाूमी होती. १० जुन १९४८ रोजी जव्हार संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. यासाठी श्री. वासुदेव करंदीकर, मारूती कुमार, दत्ता ताम्हणे इत्यादींनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.''[५]

जव्हार हे अगदी लहान संस्थान होते. मावेळी जव्हारचे राजे यशवंतराव मार्तंडराव मुकणे यांना बॅरिस्टर पदवीसाठी कायदयाचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी श्री. वासुदेव आत्माराम करंदीकर यांनी विनावेतन स्विकारली होती. या काळात जव्हारमधील

कुळांची खातेदार (जमिनदारांकडून) होत असलेल्या पिळवणूकी विरूद्ध करंदीकरांनी मशस्वीपणे कायदेशीर लढा दिला. त्यामुळे त्यांचा जव्हारमधील आदिवासी जनतेशी घनिष्ट संबंध आला. जव्हार मधील लोक करंदीकरांडक आदराने पाहू लागले. या संबंधातून करंदीकर यांच्या भोवती केशवरा जोशी, रेवजी पांडू चौधरी, नाना पाटकर, लक्ष्मणराव आळशी इत्यादी पुरोगाठी विचारांचे कार्यकर्ते गोळा झाले.

''मात्र संस्थानातील पुढारी विलीनीकरणांच्या विरूद्ध होते. त्यांना लोकनियुक्त शासन पद्धती संस्थानाधिपतींच्या नेतृत्वाखालीच हवी होती.''[६] याला प्रत्युत्तर देण्यासाठी दि.२१ जानेवारी, १९४८ रोजी मुंबई येथे सरदारगृहात तात्यासाहेब शिखरे, नाना कुंटे, भाऊसाहेब परांजपे शामराव पाटील, दत्ता ताम्हणे, वासुदेव करंदीर व जव्हार मधील मुकुंदराव संख्ये, केशवराव जोशी, रेवजी चौधरी, दत्तोवा तेंडुलकर अशा कार्यकत्यांची सभा होऊन 'जव्हार लोकसेवा संघ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. जव्हारच्या भ्रष्ट दिवाणांना काढून टाका या मागणीने लढयाला सुरूवात झाली यासाठी जव्हार आणि कुडाण येथे निघालेल्या मिरवणुकी पाहून संस्थानात खळबळ उडाली.

मध्यमंतरीच्या काळात जव्हारला लोकनियुक्त असेब्ली देण्यात आली व तिच्या निवडणुकाही झाल्या. या असेंब्लीची पहिली सभा २६ फेब्रुवारी १९४८ रोजी झाली त्यावेळी सुमारे ८०० लोकांचा मोर्चा दिवाणाला काढून टाका या मागणीसाठी असेंब्लीवर संघटित करण्यात आला होता. या प्रयत्नांमधून फारसे काही हाती लागत नाही असे दिसताच ठाणे जिल्हा समाजवादी पक्षाने स्वतंत्रपणे अर्जी हुकुमतची स्थापना करून लढा चालविण्याचा निर्णय घेतला. या सभेला वासुदेव करंदीकर हजर होते. श्री मारूती कुमार यांनी या लढयाचे नेतृत्व करावे असा ठराव करण्यात आला.'

या अगोदर दोन दिवस शाहीर लीलायर हेगडे यांचा पोवाडयाचा एक जाहीर कार्यक्रम जव्हार येथे ठेवला होता. परंतु जव्हारमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी व शासकीय कर्मचाऱ्यांनी रॉकेलचे रिकामे डब्बे वाजून गोंधळ केल्याुळे कार्यक्रम उचलून लावला गेला. त्यामुळे त्ैåैण ची भूमिका जव्हार नरेशांच्या बाजूने राहणार हे स्पष्ट झाले. परंतु कुंडाण येथे स्वातंत्र्य सैनिकांकडून होणाऱ्या हल्याची बातमी अगोदरच फुटल्यामुळे महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळीच जव्हारहून लॉरी मध्ये पोलीस पार्टी, शीख पहारेकरी व सुमारे शंभर लाठीमारी जवान क्रिमगड पोलिस ठाणे आणि कचेरीच्या सुंरक्षणासाठी स्थगित करण्यात आला. त्याच दिवशी दुपारी मुकुंदराव संरके, वासुदेव करंदीकर व दत्ता ताम्हणे हे महाराजांनी बोलावल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी जव्हारला गेले. यावेळी त्यांना व केशवराव जोशी यांना अटक करण्यात आली व नंतर सोडून देण्यात आले.

वासुदेव करंदीकर व मुकुंदराव संरके यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे सचिव श्री. व्ही. पी. मेनन यांची दि.१७ मार्च, १९४८ रोजी भेट घेऊन त्यांना सर्व हकीगत सांगितली त्यामुळे दि. २० मार्च, १९४८ रोजी जव्हार संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्याचे आकशवाणीने जाहीर केले. तरी जव्हारचा ताबा घेणे बाकी होते, या लढयासाठी राष्ट्रसंवादल व समाजवादी पक्षाचे ठाणे जिल्हयातील सुमारे ७० ते ८० कार्यकर्ते १५ दिवस सावदा व विक्रमगड येथे तक ठोकून होते. मुकुंदराव संरके वासुदेव करंदीकर आदि त्यांच्याशी संपर्क ठेवून होते.''७ अखेर १० जुन १९४८ रोजी जव्हार संस्थान भारतीय संघराजयात विलीन झाले. ठाणे जिल्हयाचे त्यावेळचे कलेक्टर श्री. जे. वी. बोमण यांनी भारत सरकारच्या वतीने संस्थानाचा ताबा घेताला.''[८]

स्वातंत्र्य चळवळीत मुरबाड तालुक्याचे योगदान महत्वपुर्ण आहे

### तळ टिपाः

१.ठाणे जिल्हा स्वातंत्र्य आंदोलन १८५७ जते १९४७, ठाणे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक सेवा समिती, ठाणे जिल्हा, १९८५. पृष्ठ

क्रं.८५
२.डॉ. कुलकर्णी विजय अनंत, स्वातंत्र्य चळवळीतील ठाणे, व्यास क्रिएशन, १६१२, पृष्ठ क्रं. ७१.
३.BPPAI- year 1913, VOI. No. 26, Page No.15-
४.डॉ. कुलकर्णी विजय अनंत, स्वातंत्र्य चळवळीतील ठाणे, व्यास क्रिएशन, १६१२, पृष्ठ क्रं. १६५
५.ठाणे जिल्हा स्वातंत्र्य आंदोलन १८५७ ते १६४७, ठाणे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक सेवा समिती, ठाणे १६८५, पृष्ठ क्रं.८६
६.कित्ता पृष्ठ क्रं. ८७
७.कित्ता पृ. क्रं. ११० ते ११२
८.स्मरणिका, जव्हार नगर परिषद, जव्हार, १६७१, पृष्ठ क्रं. १६



***संदेश वाघ***
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org